महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/ ११३७७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक : **१५.०४.२०२४**

# परिपत्रक

**विषय :** सन-२०२४ या वर्षाकरिता एम्प्लॉई पोर्टलव्दारे विनंती बदली अर्ज सादर करण्याच्या तसेच विनंती अर्ज रद्द करण्याच्या तारखेत मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :** १.प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४.
२.परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र ०५/१०१६८ दि.०१.०४.२०२४

*****

महावितरण कंपनीमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या विनंती बदलीबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४ अन्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या विनंती बदली अर्ज एम्प्लॉई पोर्टलद्वारे सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. परिपत्रक क्रमांक मासं/रवका/न.क्र ०५/१०१६८ दि. ०१.०४.२०२४ अन्वये २०२४ या बदली वर्षाकरिता एम्प्लॉई पोर्टलद्वारे विनंती अर्ज सादर करण्याची अंतिम तारखेत व कर्मचाऱ्यांना अर्ज रद्द करावयाचा तारखेत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि, सदर प्रणाली ही नव्याने विकसित केल्यामुळे कर्मचाऱ्यांना काही बाबींमुळे प्रणालीमार्फत विनंती अर्ज सादर करण्याकरिता अडचणी येत होत्या व त्यामुळे अंतिम तारखेत वाढ देण्याची बाब विचाराधिन होती. यास्तव अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख आता **३० एप्रिल** पर्यंत व विनंती बदली अर्ज रद्द करण्याची अंतिम तारीख **१५ मे** पर्यंत वाढविण्यात येत आहे.

३. उपरोक्तपणे वाढीव मुदत ही केवळ सन-२०२४ या बदली वर्षाकरिताच लागू असून अर्ज सादर करण्यासाठी दिलेल्या मुदतवाढीची नोंद घेवून इच्छुक कर्मचाऱ्यांनी या वाढीव मुदतीत अर्ज सादर करावेत. तसेच, प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४ मधील इतर तरतुदींत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या E-library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
५) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.